**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०७ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. क्षयरोगाचे अधिक रुग्ण असलेल्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करणारी 100 दिवसांची विशेष मोहिमेच्या सुरुवातीची पंतप्रधानांनी केली घोषणा.
2. भारतातील इलेक्ट्रिक वाहन उद्योग हा 2030 पर्यंत सुमारे चार कोटी रोजगार उद्योग निर्मिती करणारे क्षेत्र राहणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नागपुरात माहिती.
3. राज्य विधिमंडळाच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाचं आजचं कामकाज स्थगित, ९ तारखेला अध्यक्षांची निवड.
4. नागपूरसह पूर्व विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात आज आणि उद्या तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता.

---------------------------------------

**क्षयरोग मोहीम**

टीबी अर्थात क्षयरोगाविरुद्धचा भारताचा लढा नुकताच बळकट झाला आहे, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज क्षयरोगाचे अधिक रुग्ण असलेल्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या 100 दिवसांच्या विशेष मोहिमेच्या सुरुवातीची घोषणा केली. केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी लिहिलेला लेख वाचण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. पंतप्रधान समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये म्हणाले की “क्षयरोगाविरुद्धचा आमचा लढा आता बळकट झाला आहे! क्षयरोगाला पराभूत करण्यासाठी सामूहिक भावनेने समर्थित, अधिक रुग्ण असलेल्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून 100 दिवसांची विशेष मोहीम आज सुरू होत आहे. भारत क्षयरोगाशी बहुआयामी पद्धतीने लढा देत असून यात रुग्णांना दुप्पट मदत, जन भागीदारी, नवीन औषधे, तंत्रज्ञान आणि उत्तम निदान साधनांचा वापर यांचा समावेश आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन क्षयरोग दूर करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करूया. असं आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केलं आहे. याशिवाय निक्षय मित्र उपक्रमातून पोषक आहार योजना राबवण्यात आल्यामुळे भारताच्या क्षयरोग निर्मूलनाच्या प्रयत्नांमध्ये कमालीची सुधारणा दिसून येत असल्याचं केंद्रिय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी समजमध्यमावर नमूद केलं आहे. दरम्यान, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने नागपूर शहरामध्ये

१०० दिवसीय क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ आज स्थानिक सदर पोलीस स्टेशन जवळील जिल्हा नियोजन भवन इथून करण्यात आला.

---------------------------------------

इलेक्ट्रिक वाहनातील आगीच्या दुर्घटनेचे व्यवस्थापन

भारतातील इलेक्ट्रिक वाहन उद्योग हा 2030 पर्यंत सुमारे 4 कोटी रोजगार निर्मिती करणारे क्षेत्र राहणार असून लिथियमचे जगातील सुमारे 6 टक्के साठे हे जम्मू मध्ये प्रमाणात सापडल्याने हे लिथियम आयन बॅटरीच्या स्वरूपात 60 कोटी इलेक्ट्रिक वाहनामध्ये वापरण्यात येईल त्याचप्रमाणे लिथियम आयन बॅटरीची किंमत सुद्धा किंमत कमी होईल अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे दिली. ते आज नागपूरच्या राजनगर स्थित केंद्रीय गृह मंत्रालयात अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय-एनएफएससी येथे 'इलेक्ट्रिक वाहनातील आगीच्या दुर्घटनेचे व्यवस्थापन' या विषयावर एका कार्यशाळेला त संबोधित करत होते. यावेळी त्यांनी माहिती देताना सांगितले की गेल्या 3 वर्षांमध्ये इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांमध्ये 30 आग लागल्याच्या घटना घडल्या असून यामुळे ई व्हेईकलच्या बाजार व्यवस्थेवर परिणाम होत होता. परंतु रक्षा संशोधन विकास संस्था डीआरडीओ तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था - आयआयटी यांच्या तज्ञ कमिटीने बॅटरी सुरक्षा यावर संशोधन केले असून ऑटोमेटिव्ह इंडस्ट्रीज स्टँडर्ड अर्थात एआयएस या सुरक्षा मानांकनाने बॅटरी सुरक्षा सुनिश्चित केली असून इलेक्ट्रिक बसेस मध्ये फायर डिटेक्शन अलार्म सुद्धा आपण आता अनिवार्य केला असल्याचा त्यांनी सांगितलं. ईव्ही बॅटरी वेस्ट मॅनेजमेंटच्या संदर्भातील नियम केंद्रीय परिवहन मंत्रालयाने 2022 लाच आखले असून या संदर्भात बॅटरी रिकव्हरी आणि रिसायकलिंग व्यवस्थापनाकरिता बॅटरी उत्पादकांवर हे नियम बंधनकारक केले असल्याचं गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केलं .हायड्रोजन, इथेनॉल, सीएनजी, इलेक्ट्रिक हे भविष्यातील इंधन असून यां इंधनाच्या वापराने किफायतशीर प्रदूषण मुक्त असे इंधन उपलब्ध होऊन यामुळे सुरक्षित परिवहन सुनिश्चित होणार आहे. शेतातील तणस, परळी ऊसाची मळी यापासून बायो सीएनजीच्या निर्मितीचे 400 प्रकल्प मंजूर झाले असून त्यापकी 60 प्रकल्प सध्या सुरू झाली असून भंडारा जिल्ह्यात सुद्धा राईस हस्क पासून बायो सीएनजीचा प्रकल्प चालू झाला असल्याची माहिती गडकरी यांनी दिली. सुमारे 30 लाख इलेक्ट्रिक वाहने नोंदणीकृत असून2023-24 मध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्ये 45% वाढ झाली असून 2024 मध्ये एकूण बाजारपेठेत इलेक्ट्रिक वाहनांचे प्रमाण हे

6.4% आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीमध्ये 56% विक्रीचे प्रमाण हे इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांच असल्याचे देखील त्यांनी सांगितलं . इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रामध्ये 400 हून अधिक जास्त स्टार्टअप निर्माण झाले असून 2025 पर्यंत हायब्रीड आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या बाजारपेठेतील प्रमाण हे 8 टक्के पेक्षा जास्त होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितलं

---------------------------------------

अजित पवार

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जप्त केलेली संपत्ती मुक्त करावी, असे आदेश दिल्लीतील न्यायाधिकरण न्यायालयानं आयकर विभागाला दिले आहेत.आयकर विभागानं ऑक्टोबर २०२१ मध्ये छापा टाकून अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संबंधित असलेली सुमारे एक हजार कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली होती. यासह मुंबईतील प्रतिष्ठित नरिमन पॉइंट येथील निर्मल टॉवरसह पाच मालमत्ता जप्त करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये, एक साखर कारखाना आणि एका रिसॉर्टचाही समावेश होता. मात्र, याबाबत अजित पवारांनी न्यायालयात दाद मागितली होती. दिल्ली नायाधीकरण न्यायालयानं यावर काल सुनावणी घेत, आयकर विभागाची याचिका फेटाळली आणि अजित पवारांची जप्त संपत्ती मुक्त करण्याचे आदेशही दिले.

---------------------------------------

सुशासन सप्ताह

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व शासकीय सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने देशातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये, राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 19 ते 24 डिसेंबर 2024 दरम्यान प्रशासन गांव की ओर ही देशव्यापी मोहीम सुरू केली जाणार आहे. प्रशासन गांव की ओर ही मोहीम 2 ते 31 ऑक्टोबर 2024 या काळात केंद्रिय मंत्रालये, शासकीय विभाग व सार्वजनिक उपक्रमांनी राबवलेल्या विशेष मोहीम 4 चे विकेंद्रित स्वरुप आहे.या अभियानात 700 पेक्षा जास्त जिल्हाधिकारी सहभागी होतील. अभियानाअंतर्गत प्रशासकीय अधिकारी तहसीलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालयांना भेट देतील. सरकारी सेवा सुधारणा व नागरिकांच्या तक्रारींचे निवारण यासाठी केंद्र सरकार तालुकास्तरावर ही देशव्यापी मोहीम तिसऱ्यांदा राबवत आहे.

---------------------------------------

विधिमंडळ विशेष अधिवेशन

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. विधानसभेचे तात्पुरते अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाला सुरुवात केली. विधानसभेच्या अध्यक्षांची निवड येत्या ९ तारखेला होणार असून यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची वेळ रविवारी दुपारी बारा वाजेपर्यंत ठरवण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. यानंतर चन्नसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशीष जयस्वाल या सदस्यांना शपथ देण्यात आली. हे चौघे कोळंबकर यांच्यासोबत तालिका सदस्य म्हणून कामकाज पाहतील. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आमदारकीची शपथ देण्यात आली. इतर आमदारांच्या शपथविधीनंतर सभागृहाचं आजचं कामकाज तहकूब झालं. उद्या उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यात येईल.

---------------------------------------

हवामान

विदर्भात विशेषता पूर्व भागात नागपूर भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये आज तुरळ ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे  दरम्यान फेंगल चक्रीवादळाचा प्रभावामुळे अद्यापही विदर्भात किमान तापमान झालेली वाढ कायम आहे. आज चंद्रपूर जिल्ह्यात 17 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. तर भंडारा जिल्ह्यात 34 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. उद्या देखील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यात तुरळ ठिकाणी पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे वर्तवण्यात आली आहे. आगामी काही तासात नागपूर, चंद्रपूर आणि आगडचिरोली जिल्ह्यात मेघगर्जनेसह अत्यंत हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

---------------------------------------

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने साहित्यिक सुनील शिनखेडे यांच्या "निराकाराचे यात्रिक" या पुस्तकाचं प्रकाशन उद्या ८ डिसेंबरला रविवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. लेखक, समीक्षक संजय आर्वीकर आणि युगवाणीचे संपादक, कवी प्रफुल्ल शिलेदार यांच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन होईल. वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयातील प्रा.डॉ.अजय देशपांडे हे प्रमुख वक्ते या नात्यानं पुस्तकावर भाष्य करतील.

सेना ध्वज दिन सेना ध्वज दिन

सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज भारतीय सशस्त्र दलाच्या धर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. आजचा दिवस भारतीय सशस्त्र सेना दलाच्या पराक्रमाचा आणि हौतात्म्याचा सन्मान करण्यासाठी पाळला जात असल्याचं सिंह यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. देशाच्या संरक्षणात महत्वाची भूमिका निभावणाऱ्या सशस्त्र सेना दलाच्या कार्याची संरक्षण मंत्र्यांनी प्रशंसा केली आहे. देशवासीयांनी सशस्त्र सेना ध्वज दिन फंडात योगदान द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

---------------------------------------

परीक्षेची वेळापत्रक

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-2024 लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील काही परीक्षांच्या वेळापत्रकात नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे. ज्या परीक्षांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्यामध्ये एम.स्सी. (बॉटनी) (एन.ई.पी.), एम.एस्सी. (मायक्रोबॉयलॉजी) (एन.ई.पी.), एम.ए. (योगशास्त्र) (एन.ई.पी.) व एम.पी.ए.(ड्रामा थिएटर) (एन.ई.पी.) सर्व सेमिस्टर भाग-एक या परीक्षांच्या वेळापत्रकांत बदल करण्यात आलेले आहेत.

---------------------------------------

बालरंगभूमी

बालरंगभूमी परिषदेचं पहिलं बालरंगभूमी संमेलन २०, २१ आणि २२ डिसेंबर रोजी पुण्यात होणार आहे. या संमलेनाच्या अध्यक्षपदी चित्रपट-नाट्य अभिनेते मोहन जोशी असतील, संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्या हस्ते होणार आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

---------------------------------------